# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०९.०९.२०२६ बुधवार**

**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते उत्कृष्ट तपास करणारे अधिकारी व अंमलदार व पैरवी अधिकारी यांचा गौरव :—**

मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणारे वाहतुक, गुन्हेशाखा, पोलीस ठाणे लकडगंज, सिताबर्डी, मानकापुर, ईमामवाडा येथील उत्कृष्ट काम करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार व पैरवी अधिकारी यांचा आज दिनांक ०९.०९.२०२६ रोजी पोलीस भवन येथील दालनात प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला.

ज्यामध्ये पोलीस ठाणे मानकापुर येथील जलशुध्दीकरण केंद्रात झालेल्या क्लोरीन गॅस गळतीचे आपत्कालीन घटनेचे गांभिर्य लक्षात घेऊन, मा. श्री. आदित्य मिरखेलकर, पोलीस उपायुक्त वाहतुक शाखा यांनी त्वरीत घटनास्थळी पोहोचुन, परिसरातील शेकडो नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविले व घटनास्थळ परिसर सील करून, इतर संबंधीत विभांगाशी समन्वय साधुन, वायु गळती आटोक्यात आणुन, बंद करण्यास सहकार्य केले. तसेच, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत चोरीचा मोबाईल विकणारा आरोपी ईसम हा सक्रीय स्फोटक डेटोनेटर सह मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन अटक कारवाई करणारे वपोनि. श्री मुकुंद कवाडे, पोउपनि. सागर शिंदे, पोहवा. पंकज रगतशिंगे, पोअं. माधव कांजाळकर तसेच, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत महीलेची ऑटोमध्ये राहीलेली बॅगेचे तक्रारीवरून दखल घेवुन, तांत्रीक तपास करून, ऑटो चालकाचा शोध घेवुन सोन्या—चांदीचे दागिने असलेली बॅग महीलेस परत मिळुवन देणारे वपोनि. सुहास राऊत, पोउपनि. देवांनद बगमारे, पोअं. चेतन शेंडे, मपोअं. प्रणाली शिंदे तसेच, पोलीस ठाणे भांडेवाडी येथील नगरसेवकाचे घरावर अग्नीशस्त्राने गोळी झाडुन जिवे मारण्याचे प्रयत्नाचे दाखल क्लीष्ट गुन्ह्याची उकल करून, आरोपींना अटक करून गुन्हा उघडकीस आणनारे गुन्हे शाखेचे मपोनि. शुभांगी देशमुख, विनायक गोल्हे, सपोनि. नितीन चुलपार, वैभव बारंगे, गणेश कदम, पोउपनि. विशाल सांगोडे, मनोज राऊत, विवेक झिंगरे, पोहवा. राजुसिंग राठोड, नाजीर शेख, राजु टाकळकर, मुकेश राऊत, चंद्रशेखर गौतम, विजय यादव, देवेंद्र नवघरे, भगवती ठाकुर, निलेश ढोणे, लक्ष्मण कळमकर, गणेश बरडे, नितीन वर्मा, चंद्रशेखर राघोर्ते, पोअं. आशिष धंदरे, पंकज निकम, पराग ढोक व पोलीस ठाणे ईमामवाडा येथील हद्दपार व एमपिडीए प्रस्ताव तयार करून, मंजुरीस पाठविण्याची महत्वपुर्ण कामगिरी करणाऱ्या मपोअं. प्रिया हिरवाणी तसेच, पोलीस ठाणे मानकापुर येथील मसपोनि. भारती गुरनुले यांनी तपास केलेल्या गुन्ह्यात तसेच, कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. स्वाती बोरकर, पोहवा. जफरूद्दीन काझी यांनी उत्कृष्ट काम केल्याने आरोपींविरुध्द दोषसिध्दी होऊन मा. न्यायालयाने सश्रम कारावासची शिक्षा ठोठावली अशा सर्वांना प्रशस्तीपत्रक देवुन, अधिक उत्कृष्ट काम करण्यासाठी प्रोत्साहीत केले.

याप्रसंगी मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सहा. पोलीस आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र दाभाडे, श्री. वसंतराव परदेशी अधिकारी व अंमलदार हजर होते.






**(कामगिरी)**

**१) पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर अंतर्गत ''ऑपरेशन ऑल आऊट'' राबविलेबाबत.**

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपुर शहर, यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनात आगामी येणारे सण–उत्सव अनुषंगाने नागपूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेकरीता तसेच, शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरीता समाजकंटक, सराईत गुन्हेगार, फरार आरोपी, पाहिजे आरोपी व प्रतिबंधक कारवाईतील आरोपी यांचे हालचालीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने दिनांक ०८.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०९.०९.२०२६ चे ०२.०० वा. चे दरम्यान, नागपूर शहरातील सर्व पोलीस ठाणे हद्दीत ''Operation All Out'' विशेष मोहीम राबविण्यात आली.

मोहीमेत मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्तांसह, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सहा. पोलीस आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र दाभाडे, श्री. वसंतराव परदेशी, श्रीमती विनिता शाहु, मा. पोलीस उपायुक्त (परि. क्र. १ ते ६/ विशेष शाखा/गुन्हेशाखा/वाहतुकशाखा) नागपुर शहर, सर्व विभागीय सहायक पोलीस आयुक्त, नागपुर शहर तसेच, सर्व पोलीस ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हे आपले अधिनस्त पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचेसह सहभागी होते. Operation All Out दरम्यान पोलीस अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करुन, कोंबींग ऑपरेशन राविबण्यात आले. मोहीमेमध्ये जेल रिलीज, हद्दपार आरोपी, शरीराविरुध्द/मालमत्तेविरुध्द अभिलेखावरील आरोपी, एमपीडीए, जेल व मकोका रिलीज आरोपी तसेच, शस्त्र बाळगणारे आरोपी राहणाऱ्या वस्त्या प्राधान्याने चेक करण्यात आल्या. फरार/पाहिजे/जामीनाचे अटी भंग करणारे आरोपी, सराईत गुन्हेगार व हिस्ट्रीशीटर यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. Operation All Out दरम्यान संशयास्पद वाहने, हॉटेल्स/लॉज/धर्मशाळा/रिकामी घरे, झोपडपट्टया व बांधकामस्थळे, कबाडखाने, भंगार दुकाने व निर्जनस्थळे यांची विशेष तपासणी करण्यात आली. अभिलेखावरील शस्त्र बाळगणारे आरोपी तसेच, त्यांचे घराची झडती घेऊन हत्यार प्रतिबंधक कायदा, त्याचप्रमाणे अंमली पदार्थाबाबत गुन्हे दाखल असणारे आरोपी यांचे घराची पाहणी करून अंमली पदार्थ कायद्यान्वये कारवाई करण्यात आली. विशेष शाखा, नागपुर शहर येथील अधिकारी व अंमलदार यांनी मोहीमेत सहभागी होऊन, पोलीस आयुक्तालय हद्दीतील हॉटेल/लॉजेस/मर्मस्थळे व संवेदनशील ठिकाणांची कसुन तपासणी केली.

Operation All Out मध्ये वरीष्ठ पोलीस अधिकारी यांचेसह गुन्हेशाखा, वाहतुक शाखा, परिमंडळ क्र. १ ते ६ मधील अधिकारी व अंमलदार तसेच, नियंत्रण कक्ष येथील दंगा नियंत्रण पथके, जलद प्रतीसाद पथक हे सहभागी होते. नागपुर शहरातील यांची मोहीमेदरम्यान केलेली कारवाई पुढील प्रमाणे सविस्तर–

| अनु.क्र. | कारवाई | | एकुण |
|---|---|---|---|
| १ | पाहिजे आरोपी | एकुण पाहिजे आरोपी | 946 |
| | | तपासलेले आरोपी | 183 |
| | | अटक केलेले आरोपी | 4 |
| २ | फरारी आरोपी | एकुण फरारी आरोपी | 474 |
| | | तपासलेले आरोपी | 134 |
| | | अटक आरोपी | 3 |
| ३ | तडीपार आरोपी | एकुण आरोपी | 192 |
| | | तपासलेले आरोपी | 125 |
| | | अटक केलेले आरोपी | 1 |
| ४ | जेल रिलीज | एकुण आरोपी | 882 |
| | | तपासलेले आरोपी | 153 |
| | | मिळुण आलेले आरोपी (प्रतिबंधेक कारवाई) | 208 |
| ५ | एमपीडीए रिलीज | एकुण आरोपी | 100 |
| | | तपासलेले आरोपी | 73 |
| | | मिळुण आलेले आरोपी (प्रतिबंधेक कारवाइ) | 32 |
| ६ | मकोका रिलीज | एकुण आरोपी | 110 |
| | | तपासलेले आरोपी | 65 |
| | | मिळुण आलेले आरोपी (प्रतिबंधेक कारवाइ) | 27 |
| ७ | स्थायी वॉरट (Standing warrant) बनावणी | एकुण प्रलंबित संख्या | 37 |
| | | किती बजावले | 16 |
| | | शिल्लक संख्या | 26 |
| ८ | अजामिनपात्र वॉरट (NBW) बजावणी | एकुण प्रलंबित संख्या | 79 |
| | | किती बजावले | 23 |
| | | शिल्लक संख्या | 54 |
| ९ | एन.डी.पी.एस. (Possession) गुन्हयातील अभिलेखावरील आरोपी | एकुण आरोपी | 181 |
| | | तपासलेले आरोपी | 93 |
| | | मिळुण आलेले आरोपी | 62 |
| १० | पोक्सो गुन्हयातील अभिलेखावरील आरोपी | एकुण आरोपी | 90 |
| | | तपासलेले आरोपी | 51 |
| | | मिळुण आलेले आरोपी | 25 |
| ११ | जबरी चोरी (मोबाईल/चैन स्नेचिंग इत्यादी) गुन्हयातील अभिलेखावरील आरोपी | एकुण आरोपी | 115 |
| | | तपासलेले आरोपी | 75 |
| | | मिळुण आलेले आरोपी | 43 |
| १२ | शरिराविरुध्द गुन्हे करणारे आरोपी | एकुण आरोपी | 705 |
| | | तपासलेले आरोपी | 294 |
| | | मिळुण आलेले आरोपी | 188 |
| १३ | वाहन चोरी चे गुन्हे करणारे अभिलेखावरील आरोपी | एकुण आरोपी | 169 |
| | | तपासलेले आरोपी | 108 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| | | मिळुण आलेले आरोपी | 67 |
| १४ | घरफोडीचे गुन्हे करणारे अभिलेखावरील आरोपी | एकुण आरोपी | 192 |
| | | तपासलेले आरोपी | 136 |
| | | मिळुण आलेले आरोपी | 84 |
| १५ | ३,२५/४,२५ भा.ह.का. | दाखल गुन्हे | 12 |
| | | अटक केलेले आरोपी | 3 |
| | | किती अवैध अग्निशस्त्र/हत्यार जप्त | 11 |
| १६ | अंमली पदार्थ विरोधी कारवाई Possession (NDPS act) | दाखल गुन्हे | 1 |
| १७ | अंमली पदार्थ विरोधी कारवाई Consumption (NDPS act) अवैध दारू विक्री कारवाई | अटक केलेले आरोपी | 6 |
| | | दाखल गुन्हे | 38 |
| | | जप्त मुद्दमोल | 3,54,831/- |
| १८ | जुगार प्रतिबंधक कारवाई | दाखल गुन्हे | 35 |
| | | जप्त मुद्दमोल | 4,94,435/- |
| १९ | उघडयावर दारू पिणाऱ्यांवर कारवाई | | 10 |
| २० | मपोका १४२ अन्वये कारवाई | | 2 |
| २१ | मपोका १३५ अन्वये कारवाई | | 32 |
| २२ | मपोका १२२ अन्वये कारवाई | | 25 |
| २३ | फेरीवाल्यांवर केलेली कारवाई. | | 16 |
| **नाकाबंदी** | | | |
| २४ | वाहने तपासली | दुचाकी | 1071 |
| | | चारचाकी | 576 |
| २५ | मोटार वाहन कायद्यांन्वये करण्यात आलेली कारवाई | | 271 |
| २६ | कलम १८५ मोवाका अन्वये करण्यात आलेली **ड्रंकन ड्राईव्ह** कारवाई | | 23 |
| २७ | कलम १८४ मोवाका अन्वये करण्यात आलेली कारवाई | | 13 |
| २८ | कलम ११०, ११७ मपोका अन्वये करण्यात आलेली कारवाई | | 46 |
| २९ | कलम ३३ आरडब्ल्यु अन्वये करण्यात आलेली कारवाई | | 13 |
| ३० | कोटपा कायद्यांतर्गत करण्यात आलेली कारवाई | | 4 |
| ३० | **इतर महत्वाची कारवाई** | नागपूर शहरातील ओयो हॉटेल्स्, लॉजेस, सराय, ढाबे व आस्थापना जास्तीत जास्त प्रमाणात चेक करण्यात आल्या. | |

**२) परिमंडळ क्र. ०४ चे हद्दीतुन एकुण १४९ गुन्हेगार तात्पुरते हद्यपार :–**

नागपूर शहरातील पोळा व तान्हा पोळा त्याचप्रमाणे श्री गणेशोत्सव या सण/उत्सवाचे अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेकामी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपूर शहर अंतर्गत पोलीस ठाणे अजनी, हुडकेश्वर, बेलतरोडी, सक्करदरा, नंदनवन व ईमामवाडा हद्दीतील शरीराविरूध्द, मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारे तसेच अवैध दारू विक्री करणारे एकुण १४९ इसमांना त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची दाट

शक्यता असल्याने पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपूर शहर यांचेकडून त्यांना प्राप्त विशेष कार्यकारी दंडाधिकारी पदाच्या अधिकारांन्वये कलम १६३(२) भा.ना.सु.सं. अन्वये **दिनांक ०९.०९.२०२६ ते १५.०९.२०२६ पर्यंत ०७ दिवसांचे कालावधीकरीता** त्यांना नागपूर शहराचे हद्दीत राहण्यास परावृत्त करण्यात आले आहे. आरोपींमध्ये पोलीस ठाणे अजनी–३२, हुडकेश्वर–२०, बेलतरोडी–२१, सक्करदरा–४२, नंदनवन–२४, ईमामवाडा–१० असे एकूण १४९ गुन्हेगारांचा समावेश असून, त्यांना नमुद कालावधीचे दरम्यान पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात प्रवेश न करण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे. गुन्हेगारांनी हद्दपार आदेशाचा भंग करुन सार्वजनिक शांततेला बाधा आणणारी कोणतीही कृती केल्यास किंवा नागपूर शहरात प्रवेश केल्यास त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल.

**३) अजनी पोलीसांची कामगिरी :– कुख्यात गुंड हद्दपार**

पोलीस ठाणे अजनी हददीत **गल्ली नं. ३, रामटेके नगर, अजनी, नागपुर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे अमन राजु रंगारी, वय २८ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे अजनी, बेलतरोडी हद्दीत, गैरकायद्याची मंडळी जमवुन खुनाचा प्रयत्न करणे, दुखापत करणे, शिवीगाळ करून दुखापत करणे, अश्लील शिवीगाह करून मारण्याची धमकी देणे, अवैध दारू विक्री करणे इत्यादी गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता अजनी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. श्रीमती रश्मीता राव पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १६/२०२६ दिनांक ०५.०९.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगाराचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असुन, अजनी पोलीसांनी नमुद हद्दपार इसमास दिनांक ०६.०९.२०२६ रोजी त्याचे नातेवाईक यांचेकडे सिंधी मेघे, पो.ठाणे रामनगर, जि. वर्धा येथे सोडलेले आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मीता राव पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर, मा. श्री. नरेंद्र हिवरे सहायक पोलीस आयुक्त (अजनी विभाग), वपोनि. नितीनचंद्र राजकुमार यांचे मार्गदर्शनाखाली, पोहवा. शालीकराम शेंडे, रविंद्र लांडे, नितीनकुमार आडे, प्रविण खवसे, पोअं. रोशन वाडीभस्मे, मपोअं. सिमा भोयर व वैशाली यांनी केली.

**४) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :– वाहनचोरीचा गुन्हा करणाऱ्या आरोपीस शस्त्रासह अटक.**

दिनांक ०९.०९.२०२६ चे ००.१७ वा. चे सुमारास, यशोधरानगर पोलीसांचे पथक हे ऑपरेशन ऑल आऊट दरम्यान गुन्हेगार तपासणी मोहीम राबवित असता, पोलीस ठाणे हद्दीत विनोबा भावे नगर, गांधी पुतळ्या जवळ एक ईसम पांढऱ्या रंगाचे मोपेड वाहनाने संशयीतरित्या जाताना दिसुन आला. त्यास थांबण्याचा ईशारा केला असता, तो पोलीसांना पाहुन वाहनासह पळु लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सलमान खालीद शेख, वय २८ वर्षे, रा. राजीव गांधी नगर, मोहम्मद अनिस यांचे घरी किरायाने, मस्जीद जवळ, यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. त्याची व वाहनाची झडती घेतली असता, मोपेडचे डिक्कीमध्ये एक लोखंडी चाकु मिळुन आला. आरोपीचे ताब्यातील पांढऱ्या रंगाचे डिओ मोपेड क्र. एमएच ४९ व्हि ३४४९ बाबत कागदपत्रे मागीतली असता, त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाही. त्यास अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने पोळा मैदान परीसर येथुन नमुद वाहन चोरी केल्याची कबुली दिली. वाहनाबाबत अभिलेख तपासला असता, पोलीस ठाणे यशोधरानगर येथे नमुद वाहन चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु व मोपेड असा एकुण किंमती

३०,२००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीकडुन ०१ वाहनचोरीचा गुन्हा उघड करण्यात आला. आरोपीस अटक करण्यात आली आहे.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५, १२४ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ०५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुसचॉद शेख, पोउपनि. अनिल पाटील, पोहवा. राहुल बोंदरे, पोअं. मनिष झरकर, संदीप वानखेडे, भुषण येरोजवार यांनी केली.

**<u>५) राणाप्रताप नगर पोलीसांची कामगिरी :— लाकडी दांडा घेवुन धुमाकुळ घालणाऱ्या हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक ०९.०९.२०२६ चे ००.३० वा. ते ०१.०५ वा. चे दरम्यान, राणाप्रताप नगर पोलीसांचे पथक हे गुन्हेगार तपासणी मोहीम राबवित असता, पोलीस ठाणे हद्दीत सुभाष नगर चौक, शितला माता मंदीर जवळ एक ईसम हातात लाकडी दांडा घेवुन येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करून, धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे हातातील लाकडी दांडा काढुन त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव प्रविण देवचंद नेवारे, वय २७ वर्षे, रा. सुभाष नगर, कामगार कॉलोनी, प्रज्ञाशिल बुध्द विहार जवळ, राणाप्रतापनगर, नागपुर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३८६७/२०२४ दिनांक २८.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने व धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे राणाप्रताप नगर येथे आरोपीविरूध्द कलम १४२, १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. सिंगारेड्डी ऋषीकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ०१), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (सोनेगांव विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. पंकज बोडसे, सपोनि. राहुल कातकाडे, पोउपनि. स्वप्नील भास्कर, पोहवा. संतोष सोनटक्के, दिनेश भोगे व पोअं. अजय धुर्वे यांनी केली.

**<u>(गुन्हे)</u>**

**<u>पोलीस ठाणे सदर :— ज्वेलर्स दुकानातुन चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

पोलीस ठाणे सदर हद्दीत, फिर्यादी धिरज महेंद्रकुमार गोलछा, वय ४५ वर्षे, रा. गोलछा मार्ग, कराची गल्ली, सदर, नागपुर यांचे पारस ज्वेलर्स नावाचे सोन्या—चांदीचे दुकान समोरील बाजुस असुन, मागील बाजुस त्यांची आई, लहान भाऊ व बहीण असे परीवारासह राहतात. फिर्यादी हे ह.मु.— कुकरेजा सन सिटी, कपीलनगर येथे राहतात. दिनांक ०९.०९.२०२६ चे ११.०० वा. त्यांचे दुकानातील काम करणाऱ्या ईसमाने त्यांना फोन करून सांगीतले की, दुकानात चोरी झालेली आहे. फिर्यादी यांनी येवुन दुकानातील सिसिटीव्ही कॅमेराची पाहणी केली असता, त्यांना सकाळी ०८.४६ वा. ते ०८.४९ वा. चे दरम्यान, दुकानाचे उघडे शटर मधुन आंत प्रवेश करून, अज्ञात चोरट्याने शोकेस ट्रेमधील सोन्याच्या वेगवेगळ्या २८ अंगठी वजनी ७० ग्रॅम, १६ नग मंगळसुत्र पदक

वजनी ५० ग्रॅम व डोरले वजनी १५ ग्रॅम असा एकुण सोन्याचे वेगवेगळे दागिने एकुण किंमती १६,२०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेताना दिसुन आला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे मसपोनि. शुभांगी पाटील ९५९४९५२९२८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**